दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● रविवार १४ जूले २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३३२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये




# मराठ्यांना कोणी अडचणीत आनंल तर बघ्याची भूमिका घेऊ नका- मनोज जरांगे

## मी दिमागाने खेळतो – जरांगे

**मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं की, 'मी थांबून निर्णय घेत असतो. मी सर्व दिमागाने खेळत असतो. प्रत्येक वेळी ताकदीचा वापर करायचा नाही. बुद्धीचाही वापर करायचा असतो. फडणवीस, शिंदे, अजितदादा आणि महाजन यांनाही डावात हरवलं. सोपी गोष्ट नाही. भुजबळ आता काहीही बडबडताय. प्रत्येक वेळी सरकार फसलं. त्यांनी आपल्याला फसवण्याचं काम केलं. त्यांना मी जे वाटलो होतो, तसा मी नाही हे त्यांच्या लक्षात आलं आहे. त्यामुळे मला वेळ देत जा. एकदा जर गाळात पाय फसला आणि वाट सोडून पाय पडला तर निघणार नाही. समाज फसला तर मी स्वतला आयुष्यभर माफ करणार नाही. मला तुमच्या जीवावर काहीच कमवायचं नाही. मला तुमची पोरं मोठी झालेली पाहायचे आहे.'**



**छ. संभाजीनगर/विशेष** मनोज जरांगे यांनी संभाजीनगरमधील सभेमध्ये बोलताना राज्य सरकार आणि राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ, भाजपचे नेते गिरीश महाजन यांच्यावर निशाणा साधला. येत्या २० जुलैपासून आमरण उपोषणाला सुरूवात करणार असल्याची घोषणा दिली आहे. यावेळी बोलताना मराठा अधिकाऱ्याला त्रास दिला तर मराठा गाठ माझ्याशी आहे. एखाद्या मराठ्याच्या अधिकाऱ्याकडे गेले तर तू मराठा आहे म्हणून काम करत नाही का ? असं धमकवायचे. त्याला काम करायचे नसले तरी काम करावं लागायचे. डॉक्टरांकडे जाणार. मराठा आहे म्हणून बील कमी करत नाही का ? वकिलाकडेही जायचे. मराठ्यांचा आहे म्हणून फि जास्त घेतो का ? म्हणून वकिलाला बोलायचे. मराठ्यांचा मंत्री आहे म्हणून काम करत नाही का ? असं मंत्र्यांना म्हणायचे, पदाचा आणि जातीचा काय संबंध आहे ? असा सवाल मनोज जरांगे यांनी केला. मराठ्यांना कोणी अडचणीत आनंल तर बघ्याची भूमिका घेऊ नका. सर्वांनी त्याच्या मदतीला जायचं. अजिबात मागे हटायचं नाही. सपोर्ट करावा लागणार आहे. भांडण नाही करायचं. तुम्ही फक्त उभं राहा. दहशत कमी होते. तुम्ही उभे राहत नसल्याने ही दहशत वाढली आहे. कुणाच्या पायाही पडू नका. तुमच्या हातात सत्ता दिली म्हणजे तुम्ही अन्याय करणार का. मराठा अधिकाऱ्याला कुणालाही कुणी त्रास दिला तर मदतीला जायचं. नाही तर छगन भुजबळ सारख्या भंगार लोकांचं फावतं असं म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी भुजबळ यांच्यावर निशाणा साधला. मी फक्त माझ्या समाजाची इज्जत करतो. बाकीच्यांची करतो. पण माझ्या समाजाला त्रास देणाऱ्यांची इज्जत करत नाही. एकटाच ५० ते ५५ टक्के मराठा आहे. काय गरज आहे आम्हाला कोणाची. फक्त त्यांनी आम्हाला जी वस्तू हातात घ्यायची ती घ्यायला लावू नका. मराठ्यांना त्या वळणावर जायचं नाही. त्यामुळे म्हणतो मला वेळ गरजेची आहे. मी शेवटचं टोक गाठत नाही, असं जरांगे म्हणाले.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बैठक संपन्न.

बीड/प्रतिनिधी शिवसंग्राम चालक-मालक संघटना जिल्हा परिषद पॉईंट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अध्यक्षपदी तुकाराम वाघमारे. ऊर्फ तात्या, उपाध्यक्ष बाळासाहेब दोडके, परमेश्वर शिंदे सचिव, यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या वेळी उपस्थित नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पॅंथर सेना बीड, जिल्हा परिषद पॉइंट बीड चे अध्यक्ष राजु भाऊ भोसले, अशोक थोरात,



विनोद वडमारे, राजरतन वडमारे, संदीप भांबे, जालिंदर पाखरे, नवनाथ डावकर, सुनील काळे, रंजीत वाघमारे, अमोल लोखंडे, जालिंदर वारे, अशोक क्षीरसागर, राजू वाघमारे, भगवान पंधारे, कैलास वंजारे, शंकर मोरे, बाबा शेळके, रजाक पठाण, जमील शेख, नवी पठाण, संजय पायगुडे, बाबा शिंदे, तात्या कदम, राजेश चव्हाण, हनुमंत ननवरे, विनोद मस्के, अशोक राठोड, परमेश्वर पवार, कृष्णा राठोड, गिरधारी मोरे, सुनील काळे, अभिमान डोंगरे, गोरख ठोकरे, दादा शिंदे, उगले मामा, हनुमान जगदाळे, काळकुटे, प्रवीण सुदामे, ऋषिकेश बेदरे, धर्मेंद्र शिंदे, भरत सांगोळे, मोहन वाघमारे, विकास गोटे, जय राम बांगर, अण्णा शिणगारे, अंगद धनवे, दादा ढवळे, अमोल जोगदंड, नितीन मुंडे, प्रमोद वडमारे, व शिवसंग्राम चालक-मालक संघटना जिल्हा परिषद पॉइंट बीड या सर्वांच्या सर्वानुमते ही निवड करण्यात आलेली आहे व इत्यादी उपस्थित होते.

## पंकजाताई आमदार झाल्याबद्दल समर्थकांचा चौसाळा येथे आनंदोत्सव पवन कुचेकर यांनी केली गुलालाची उधळन

**बीड : (प्रतिनिधी)**
भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी विधानपरिषद निवडणुकीत पहिल्या पसंतीची मते घेऊन दणदणीत विजय संपादन केला. या विजयानंतर जिल्ह्यासह वाड्या- वस्त्यात पंकजाताई समर्थकांनी गुलालाची उधळण करत फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष साजरा केला. यावेळेस कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहवयास



मिळाला. पंकजाताई मुंडे यांच्या विजयाकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. विजय जाहीर होताच राज्यभरातून हजारो कार्यकर्त्यांनी आपल्या ताई आमदार झाल्याबद्दल विजयोत्सव साजरा केला. अबालवृद्ध या विजयी क्षणाचे साक्षीदार होते. चौसाळा शहरात भाजपा अनुसुचित जाती मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर यांनी गुलालाची उधळण करत फटाक्यांची आतषबाजी केली. यावेळी अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच विविध ठिकाणी वाजतगाजत पेढे वाटून आनंद व्यक्त केला.

## १८ जुलैला आषाढी वारी परतताना धारूर येथे पालखी मार्गावर वारकऱ्यांची आरोग्य तपासणी व भोजन व्यवस्थाचे आयोजन.

किल्ले धारूर /प्रतिनिधी धारूर येथे दि. १८ जुलैला गुरूवारी आषाढी वारी परतताना पालखी मार्गा वर वारक-याची आरोग्य तपासणी व भोजन व्यवस्थाचे आयोजन करण्यात आले असून दिवस भर हि सेवा सुरु राहणार आहे यांचा लाभ घ्यावा असे आवाहण या संयोजकानी केले आहे.

आषाढी वारीला पालख्या पायी जात असताना या भावीकाची मोठ्या प्रमाणात सेवा केली जाते मात्र



आषाढी परतताना या भाविकाना अनेक समस्याना तोंड द्यावे लागते. धारुर येथून शेगाव पंढरपुर हा पालखी मार्ग झाल्या पासून विदर्भ, जालना, परभणी, हिंगोली आदी जिल्ह्यातील भावीक वर्ग जाताना परतीला हा मार्ग वापरतात या भावीकाची सोय व्हावी या साठी धारूर शहरातील युवक आषाढी वारीहून परतणा-या भावीकांची सोय गेल्या आठ वर्षा पासून करतात या वर्षी भोजना बरोबरच या वारक-याची गरज लक्षात घेऊन आरोग्य तपासणी शिबीर आयोजीत केले असून धारूर ग्रामीण रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. शशांक वाघमारे यांचे पथक वारक-यांची आरोग्य तपासणी करणार असून दि.18 जुलै रोजी या पालखी मार्गा लगत असणा-या जाधव मंगल कार्यालयात दिवस भर हे दोन्ही उपक्रम राबवण्यात येणार असून वारक-यानी या दोन्ही उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहण या उपक्रमाचे संयोजकानी केले आहे.

## पिंपरगव्हाण येथे आज मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळ्याचे आयोजन

नवगण राजुरी /प्रतिनिधी) पिंपरगव्हाण येथे आज मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. आज रविवार दि.१४ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत श्री बिरूबा देवस्थान मौजे पिंपरगव्हाण येथे ह.भ.प.रंगनाथ महाराज सुरळेगावकर यांच्या शुभहस्ते मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळा संपन्न होणार आहे. तरी या कार्यक्रमास भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन समस्त गावकरी मंडळी पिंपरगव्हाण यांनी केले आहे.

## स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयातील मुलींच्या वस्तीगृहासाठी वाढीव 30 कोटी रुपये आ. नामिताताई मुंदडा

**अंबाजोगाई/प्रतिनिधी**
केज विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामांसाठी वाढीव ३० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद अर्थसंकल्पातून करण्यात आली आहे. आ. नमिता मुंदडा यांच्या मागणीनंतर अंबाजोगाई येथील स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयातील मुलींच्या वस्तीगृहासाठी वाढीव २० कोटी रुपये तर नेकनूरच्या स्त्री रुग्णालयातील विविध कामांसाठी ३० लाखांचा



निधी मंजूर करण्यात आला आहे. अंबाजोगाईच्या स्वाराती वैद्यकीय महाविद्यायातील विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि पूर्वीचा वसतिगृह इमारतींची दुरावस्था लक्षात घेता आ. नमिता मुंदडा यांनी प्रयत्नपूर्वक वस्ती गृहाच्या नवीन इमारतींसाठी निधी खेचून आणला. यामध्ये १६० विद्यार्थिनींच्या वसतिगृहासाठी १० कोटी ८० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मात्र, बांधकामाच्या अंदाजपत्रकात वाढ झाल्याने वाढीव निधी मिळण्याबाबत आ. मुंदडा यांनी शासनाकडे मागणी केली होती. वास्तव लक्षात घेत शासनाच्या व्यय अग्रक्रम समितीने वाढीव बांधकाम खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देत सदर वसतिगृहासाठी एकूण ३० कोटी ४ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. तसेच, नेकनूर येथील स्त्री रुग्णालयात बसण्यासाठी शेड बांधणे, महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालये आणि पर्किंग शेड बांधणे या कामांसाठी २९ लाख ९५ हजार रुपयांच्या निधीस मंजुरी देण्यात आली आहे. लवकरच या कामांची निविदा प्रक्रिया पार पडणार असून त्यानंतर लागलीच बांधकामाला सुरुवात होणार असल्याची माहिती आ. मुंदडा यांनी दिली.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बैठक संपन्न.

बीड/प्रतिनिधी शिवसंग्राम चालक-मालक संघटना जिल्हा परिषद पॉईंट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अध्यक्षपदी तुकाराम वाघमारे. ऊर्फ तात्या, उपाध्यक्ष बाळासाहेब दोडके, परमेश्वर शिंदे सचिव, यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या वेळी उपस्थित नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पॅंथर सेना बीड, जिल्हा परिषद पॉइंट बीड चे अध्यक्ष राजु भाऊ भोसले, अशोक थोरात, विनोद वडमारे, राजरतन वडमारे, संदीप भांबे, जालिंदर पाखरे, नवनाथ डावकर, सुनील काळे, रंजीत वाघमारे, अमोल लोखंडे, जालिंदर वारे, अशोक क्षीरसागर, राजू वाघमारे, भगवान पंधारे, कैलास वंजारे, शंकर मोरे, बाबा शेळके, रजाक पठाण, जमील शेख, नवी पठाण, संजय पायगुडे, बाबा शिंदे, तात्या कदम, राजेश चव्हाण, हनुमंत ननवरे, विनोद मस्के, अशोक राठोड, परमेश्वर पवार, कृष्णा राठोड, गिरधारी मोरे, सुनील काळे, अभिमान डोंगरे, गोरख ठोकरे, दादा शिंदे, उगले मामा, हनुमान जगदाळे, काळकुटे, प्रवीण सुदामे, ऋषिकेश बेदरे, धर्मेंद्र शिंदे, भरत सांगोळे, मोहन वाघमारे, विकास गोटे, जय राम बांगर, अण्णा शिणगारे, अंगद धनवे, दादा ढवळे, अमोल जोगदंड, नितीन मुंडे, प्रमोद वडमारे, व शिवसंग्राम चालक-मालक संघटना जिल्हा परिषद पॉइंट बीड या सर्वांच्या सर्वानुमते ही निवड करण्यात आलेली आहे व इत्यादी उपस्थित होते.



# अंबानगरीने केला नव्या खासदारांचा नागरी सत्कार

## पालकमंत्र्यांना लोकसभेतले पाप विधानसभेत फेडावे लागणार , खा.बजरंग सोनवणे कडाडले

### प्रचार आणि प्रहार

कालचा आवेश प्रचंड आश्वासक होता बजरंग सोनवणे यांनी अगदी निडर भूमिका मांडताना कार्यकर्त्यांना प्रचंड बळ दिले .अंबाजोगाई मला आई सारखी असून विकासात कसूर आणि कसर सोडणार नसल्याचे त्यांनी म्हटले . सभेत मध्ये बजरंग सोनवणे यांनी ज्या आवेशात भावना मांडल्या त्यातून त्यांचा लढवय्या करारी बाणा दिसून आला

### साठे साहेब -

**साठे साहेबांनी आपल्या अंदाजात आजची तारीख ही तेरा साथ आहे,आपण अंबाजोगाई करांची साथ कधीही सोडू नये म्हणून आजची तारीख निवडली आहे,आणि बप्पांच्या हाताने गोर गरीबांचे कामे होवेत,अश्या शुभेच्या दिल्या.**



**प्रतिनिधी**

सत्ता पक्षांचे नेते , धनशक्ती , सत्तेचा पुरेपूर वापर , दबाव तंत्राचा वापर करून देखील इथे जनतेने सत्तांध शक्तीचा पराभव करून सर्व सामान्य शेतकऱ्याचे पोरग खासदार केले , मी होऊच नये म्हणून जीवाचे रान आणि आकाश पाताळ एक करताना पालकमंत्र्यांनी जातीवाद आणि दबाव सारखे पाप केले जे विधानसभेत फेडावे लागेल असा दम भरताना सहा मतदार संघात तुतारीचा निनाद होणार असल्याचे सांगितले . नव्या खासदाराचा सत्कार करताना अंबाजोगाई प्रचंड नटली होती , प्रचंड गर्दी उत्साहात बजरंग सोनवणे यांच्या सत्काराला समाज एकवटला .

पालकमंत्री यांनी जे पाप लोकसभेला केले आहे,ते पाप येणाऱ्या विधान सभेला फेडावे लागणार आहेअसे म्हणताना बजरंग सोनवणे यांनी कालच्या सभेत जोरदार प्रहार चढवला .येणाऱ्या काळामध्ये बीड जिल्ह्यामध्ये आपल्या महविकास आघाडीचे सर्व आमदार निवडून अनायचे आहेत,आपण मला खासदार केले अत्ता आपल्या जिल्ह्याचे राहिलेले काम करण्यासाठी कामे करून कशी घ्यायची ते मी बगतो,अश्या शैलीत आपले भाषण केले,माझ्या सहित जिल्ह्यातील सर्व जनतेला त्रास दिला,त्याचा हिशोब अत्ता विधान सभेला होणार आहे,जाती जाती मध्ये तेढ निर्माण करण्याचे काम बंद करा, मनोज दादाना मला शिव्या देतात त्यांना पाठीशी कोण घालतंय,त्यांना आवर घाला, असा इशाराही खासदारांनी अप्रत्यक्ष पालक मंत्र्यांना लगावला,आलेल्या सर्व निवेदनाच्या कामाचा पाठपुरावा करून मार्गी लावण्याचे काम करणार आहे, जिल्हा परिषदेच्या शाळेच्या दर्जा वाढवण्याचे काम करू, हारवेस्टर व ऊस तोडणी मजुरांचा दर सारखाच कशा होईल याचा ही प्रयत्न करू,बीड जिल्ह्यातील शेतकऱ्याचे दरडोई उत्पन्न वाढवण्याचे काम मला करायचं आहे, काटा मारून कारखाना चालवणारी अवलाद माझी नाही,आणि मी कटा मारून कारखाना चालवत असेल तर पालकमंत्र्यांनी 3 वर्ष ऊस माझ्या कारखान्याला दिला कसा असा खोचक सवाल केला, आपण वयाने छोटे आहात,टीका करत असताना विचारून करा,माझे अत्ता सुरू झाले आहे,आपले संपत आले आहे, याचाही विचार आपण करावा, असे ठणकावत बजरंग सोनवणे यांनी पालकमंत्र्यांना उद्याच्या राजकारणात दोन हात करण्याचे आव्हान दिले .केवळ जातीचे राजकारण करून जर कुणाला सत्ता मिळवायची असेल तर इथले सामान्य मतदार हा कावा पूर्ण होऊ देणार नसल्याचे म्हटले .

. . . . . . . . . . .

### कालिदास आपेट

आपल्या मराठवाड्यामध्ये सर्वात जास्त भाव खासदारांच्याच कारखान्याने दिला आहे, हार्वेस्टर व ऊसतोड मजूर यांना तोडणीचा भाव सारखाच मिळावा याची मागणी सभागृहात करावी अशी विनंती करून बाप्पांना शुभेच्छा.

राजेसाहेब देशमुख

देश्यामध्ये व महाराष्ट्र मध्ये राहुल गांधी,शरद पवारसाहेब, उद्धव ठाकरेसाहेब, यांनी प्रचंड मेहनत घेतली. आपण सर्वांनी लोकसभा निवडणुकीमध्ये परिवर्तन केले तसेच येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये ही परिवर्तन करायचे आहे.

# बीड जिल्ह्याने भरभरून प्रेम दिलेसर्वांच्या सहकार्याने विकासात्मक कामे करु शकले

## ममावळत्या जिल्हाधिकारी दिपा मूधोळ- मुंडे यांचे निरोप समारंभ प्रसंगी भावपूर्वक उद्गगार

बीड, दि. 13:- बीड जिल्ह्यामध्ये विकास कामे करतांना अनेक अडचणी आल्या पण बीड जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांच्या प्रेमामुळे त्यावर मात करून बीड जिल्ह्याचा नेहमीच विकासात्मक दृष्टीने विचार केला आणि ही कामे तडीस नेली. शासन आपल्या दारी, महासंस्कृती कार्यक्रम आणि बीड जिल्ह्यात बालविवाह हा ऐरणीवरचा प्रश्न होता. यामध्ये विशेष लक्ष घालून ही मोहीम यशस्वी होण्यासाठी विविध विभागाने मदत केली. त्यामुळे अनेक वेळा बालविवाहही रोखण्यात आले. सर्वांच्या सहकार्याने अनेक विकासात्मक कामे करु शकले, असे भावपूर्वक उद्गगार मावळत्या जिल्हाधिकारी दिपा मूधोळ मुंडे यांनी निरोप समारभ प्रसंगी काढले.

विशेषत: हा नूतन जिल्हाधिकारी अविनाश पाठक (तत्कालीन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी) , मुख्य कार्यकारी अधिकारी संगितादेवी पाटील तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर आणि संबधित यंत्रणेने मोलाचे सहकार्य केले.कृषी क्षेत्रातही बीड जिल्हयाला पहिला क्रमांक मिळाला ही पण आपल्या सर्वासाठी अभिमानाची बाब आहे.

बीड जिल्ह्याविषयी अनेक वेळा नकारात्मक विचारच ऐकायला मिळाले. आपण जेव्हा कोणत्याही कामाचा मनातून ठाम निश्चय करून ते करण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी ते सकारात्मकतेतून पूर्णत्वास जाते, बीड जिल्ह्याच्या



आठवणी हया अमिट आहेत, त्या मी कधीही विसरू शकणार नाही. घर सांभाळणे, कुटुंब सांभाळणे ही जबाबदारी केवळ महिलांचीच नसून पुरुषांची देखील आहे. जे गरीब, पिडीत लोक आहेत त्यांची कामे, करा त्यांचा अर्शिवाद नक्कीच तुमच्या कामी येईल. बीड जिल्हयात मोठे उद्योग, कारखाने नाहीत त्यामुळे तरुण वर्गाच्या हाताला काम नाही येथे मोठे उद्योग येतील यासाठी प्रयत्न करावा,तरुण पिढीला याचा उपयोग होईल. शेवटी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे निरोप समारंभाला उत्तर देताना म्हणाल्या की, मुलांना जपा त्यांच्या शिक्षणाकडे, आरोग्याकडे लक्ष द्या, बीड जिल्ह्यामध्ये तरुण पिढी व्यसनाधीन होत आहे ही फार गंभीर बाब आहे, असे भावनिक उद्गारही मावळत्या जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी या प्रसंगी व्यक्त केले.

नूतन जिल्हाधिकारी अविनाश पाठक हे म्हणाले की. बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मी नेहमीच कटिबद्ध राहील. मावळत्या जिल्हाधिकारी यांच्यामध्ये मला नेहमी आईच दिसत असे, त्यांनी नवरात्रीची तीनच रूपे दाखवली, अष्टमी व नवमीचे रूप त्यांनी कधी दाखवलेच नाही, त्यांच्या कामाची हातोटी आणि संयम हा नेहमीच लक्षात राहण्यासारखा आहे. बीड जिल्ह्यातील लोकसभा निवडणूक हा सर्व देशात लक्ष वेधून घेणारा विषय होता पण तोही त्यांनी संयमाने, चातुर्याने हाताळला, जिल्हयात जाळपोळ झाली त्यावेळी त्यांनी फक्त यंत्रणाचा कामाला लावली नाही तर त्या स्वत: रस्त्यावर उतरल्या व जमाव शांत केला. कोणतेही काम असो जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे हया स्वत: पुढाकार घेउन करत असत , ही मोठी महत्त्वाची बाब आहे. श्रीमती मुधोळ-मुंडे यांचा संयमाने काम करण्याचा आदर्श घेण्यासारख असून त्यांच्या सोबत छत्रपती संभाजीनगरपासून ते बीड जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार सांभाळल्यापासूनचा अनुभव माझ्या पुढील वाटचालीस निश्चितच कामी येईल, असे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यावेळी म्हणाले.

. या कार्यक्रमास नूतन जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, उपजिल्हाधिकारी (सामान्य) शैलेश सूर्यवंशी, जिल्हा शल्य चिकित्सक अशोक बडे, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुंबे,उप मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके व विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी संघटनेच्या पदाधिकारी यांनी श्रीमती मुंडे यांचा सत्कार केला तसेच आपल्या मनोगतातुन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ- मुंडे यांच्या सोबत काम करतानाचे अनुभव सांगितले.

# मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद रस्ते गेले कुठे? लोकवर्गणीतून ग्रामस्थांवर रस्ते करण्याची वेळ :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने नुकत्याच काढलेल्या आदेशाने राज्यातील मातोश्री पाणंद रस्त्यांना दर्जावाढ देण्याचा निर्णय घेतला असुन जिल्हा परिषद बांधकाम विभाग व पंचायत समितीचा वित्त आयोगाचा निधी मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला असुन बीड जिल्ह्यात २५०० पाणंद रस्त्यांना दर्जावाढ मिळाल्याची प्रसार माध्यमांमध्ये गाजावाजा करणा-या जिल्हा प्रशासनाचा बुरखा सध्या पावसाळ्यात ग्रामीण भागातील ग्रामस्थांनी शासन दरबारी हेलपाटे मारुन त्रस्त ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून रस्ता कामास सुरुवात केल्याने पुरता फाटला असुन शासनाप्रती तिव्र नाराजी ग्रामस्थांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना व्यक्त केली आहे.

शिक्षणासाठी लेकरं बाहेर गावी पाठवली तर शेतात मजुर येत नाही :- अच्युत वायभट, अभिजित गायकवाड बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत अंतर्गत वायभट वस्ती, गिरे वस्ती, शिंदे वस्ती, मुळे वस्ती, जोगदंड वस्ती, शिंदे वस्ती येथील जवळपास एकुण २०० लोकसंख्या असलेल्या ग्रामस्थांना पावसाळ्यात गुडघाभर चिखलातून अडीच किलोमीटर अंतरावरून लेकरांची शाळा, भाजीपाला,दुधदुभतं, बाजारहाट यासाठी लिंबागणेश गावात यावं लागतं.७५ वर्षांपासून आम्हाला रस्ता मिळालाच नाही. लेकरांच शिक्षण व्हावं म्हणून लेकरं बाहेरगावी शिकायला टाकली. चिखलामुळे शेतमजूर शेतात यायला तयार नाहीत. शेवटी ४० कुटुंबातील व्यक्तींनी घरागणीस ५००० रूपये लोकवर्गणीतून २ लाख रुपये जमा केले असुन रस्ता कामाला सुरुवात केली आहे. बळीराजाचं नाव घेऊन सरकार चालवताना शेतकऱ्यांच्या रस्ता, वीज, पाणी सारख्या मुलभूत गरजा स्वातंत्र्यानंतर ७५




वर्षं उलटुनही पुर्ण करू शकत नसल्याची खंत बोलावून दाखवली.रस्ताकामासाठी अच्युत वायभट, सतिश वायभट, अभिजित गायकवाड, गणेश खिल्लारे, दिनेश जोगदंड,उमेश जोगदंड, अतुल जोगदंड,संजय पौळ, विक्की भोसले, महादेव जाधव,गोकुळ मुळे,आण्णा मुळे,बाळु मुळे,कृष्णा गिरे, गोवर्धन गिरे,सुंदरभाऊ वाणी, अशोक खिल्लारे, राजेंद्र बाबर,सतिश शिंदे, शेख शौकत यांनी पुढाकार घेतला.

मातोश्री पाणंद रस्ते कागदोपत्रीच , लोकवर्गणीतून ग्रामस्थांनी रस्ते करण्याची वेळ वेदनादायी:- डॉ.गणेश ढवळे ग्रामीण भागात शेतवस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना अस्तित्वात आली मात्र पावसाळा सुरू होण्यापूर्वी रस्ता कामे अपेक्षित असताना शासकीय नियमांच्या कचाट्यात योजना सापडली असुन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी प्राप्त असुन भ्रष्टाचाराचे कुरण झाल्याने योजना कागदावरच कार्यान्वित असल्याचे आढळून येत आहे.शासनाने ग्रामस्थांच्या अडचणींकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

## शेख अक्रमपाशा मित्र मंडळ व 10 वी बॅच चा 200 झाडे लावण्याचा सुत्य उपक्रम संपन्न

नेकनुर /प्रतिनिधी
नेकनूर येथील शेख अक्रम पाशा मित्र मंडळ व संपूर्ण १० वी ची बॅच ने २०० झाडांचे वृक्षारोपण करून सुत्य उपक्रम राबविण्यात आला.

ईदगाह मैदानाच्या ठिकाणी वृक्षारोपणाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते. शेख अक्रम पाशा मित्र मंडळ समाजकार्य करण्यात प्रत्येक वेळी अग्रेसर असतो. ईदगाह मध्ये सावलीची आवश्यकता व सध्या झाडांची आवश्यकता पाहून शेख अक्रम पाशा मित्र मंडळ यांनी २०० झाडांचे वृक्षारोपण करून अनोखा उपक्रम राबवला.



या उपक्रमात तरुणांनी सहभाग घेतला होता. ही वृक्ष लावून त्यांचे संगोपन करण्याचा निर्धार या तरुणांनी केला. नेकनूर मध्ये सिमेंटचे वाढते रस्ते ,जंगल आणि निसर्गाची झपाट्याने होत असलेली हानी यामुळे तापमानात वाढ झालेली आहे. औद्योगिकीकरणामुळे रस्त्यांचे जाळे पसरलेले असले तरी रस्त्यालगत वृक्षांचा वाणवा आहे. तर दुसरीकडे नेकनूर परिसरात दररोज येणाऱ्या हजारो वाहनांमधून सोडण्यात येणारा कार्बनडॉक्साइड वायूचाही परिणाम होत आहे. तापमान रोखण्यासाठी वृक्षलागवड करून वातावरणातील समतोल राखणे गरजेचे आहे. त्यासाठी अनेक उपक्रम शासकीय पातळीवर राबविण्यात आले मात्र त्याचा परिणाम झाला नाही. अनेकदा वृक्षारोपण केल्यानंतर काही दिवसांतच ही वृक्ष नष्ट होत होती वा त्यांची वाढ न झाल्याने वृक्ष लागवड करूनही फायदा होत नव्हता.यात शेख अक्रमपाशा मित्र मंडळ ने आता वृक्ष लागवड करून त्याची निगा राखण्याची जबाबदारीही निश्चित केली आहे. त्यामुळे वृक्षांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे. यावेळी शेख अक्रम सर , मोहसीन ,मुन्ना (समीद) रिजवान जागीरदार, वसीम कुरैशी,मुदस्सर ,आजम अतार,मूईज मिर्झा ,मुदस्सर, गौस पाशा, बाबा बदयोदिन अब्दुल रज्जाक,समीर ,मैनु ,साथी इमरान अन्वर अली,तोफिक पटेल, इम्रान हाश्मी, सय्यद वसीम चूनू,अब्रार, मित्र मंडळाचे सदस्य मोठ्या उपस्थित होते.

## लुटारु कर्मचाऱ्यांवर तहसीलदार यांचे नियत्रण नाही का..? भीमसेन आप्पा लोमटे

**अंबाजोगाई/परवेज पटेल**
अंबाजोगाई शाळा, कॉलेज सुरु झाल्या मुळे विध्यार्थ्यांना शासनाच्या विविध योजनेचे फायदे घेण्यासाठी उत्पन्न, डोमासाईल, रहिवाशी प्रमाणपत्राची गरज भासत असते हे सर्व कागदपत्रे महाई सेवा केंद्र मार्फत काढले जातात. नियमानुसार हे प्रमाणपत्र काढण्यासाठी काही ठरावीक रक्कम आकारण्यात आली. मात्र यापेक्षा अव्वाचे सव्वा पैसे घेवून हे प्रमाणपत्र दिले जाते. विशेष करून अंबाजोगाई तहसिलमधील कर्मचारी महाई सेवा केंद्राकडून जास्तीचे पैसे घेत आहेत. त्यामुळे महाई सेवा केंद्रावाले संबंधित लोकांकडून एका प्रमाणपत्रासाठी १०० ते १५० रूपये घेवून लुट करत आहेत. शालेय महाविद्यालयीन कामकाजांसाठी विविध कागदपत्रांची गरज असल्याने कागदपत्र काढण्यासाठी महाई सेवा केंद्रात तोंबा गर्दी उसळलेली आहे. याचाच गैरफायदा सध्या कर्मचारी



उचलू लागले. सर्व सामान्यांची लुट करणाऱ्या तहसिल मधील कर्मचाऱ्यावर कोणाचे नियंत्रणआहे की नाही असा प्रश्न उपस्थित होवू लागला. नियमित लागणारे कागदपत्र लवकर मिळावे यासाठी शासनाने जागो जागी महाई सेवा केंद्र सुरू केले. या केंद्र मार्फत संबंधित नागरीकांना कागदपत्र मिळतात. महाई सेवा केंद्रावाले ऑनलाईन तहसिलच्या माध्यमातून ही कागदपत्रे मंजुर करून घेत असतात. यासाठी विविध कागदपत्राची गरज असते याचाच गैरफायदा तहसिल मधील कर्मचारी उचलू लागले.

कागदपत्र काढण्यासाठी नियमानुसार ठरावीक रक्कम आकारण्यात आली असली तरी महाई सेवा केंद्र चालकांना तहसिलमधील चार टेबल सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांना पैसे द्यावे लागतात. एक्या प्रमाणपत्र १०० ते १५० रूपये घेतले जात आहेत. एवढी मोठी लुट तहसिलमधील कर्मचाऱ्यांकडून होत असतांनाही याकडे मात्र तहसीलदार यांचे साफ दुर्लक्ष होत असल्याचे दिसुन येत आहे तहसिल कार्यालयामध्ये उत्पन्न, डोमासाईल, रहिवाशी प्रमाणपत्र जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र सह इतर प्रमाणपत्र मंजुर केले जातात. यासाठी ठरावीक टेबल तयार करण्यात आले आहेत. या टेबलवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची बारा महिने चांदी असते, लठ्ठ पगार असतांनाही कर्मचारी प्रत्येक एका प्रमाणपत्रासाठी १०० ते १५० रूपये घेवून सर्व सामान्यांची लुट करतात.

## चौसाळा शहरातील पथदिवे बंद अवस्थेत चौसाळा ग्रामपंचायतचे मुलभुत सुविधेकडे दुर्लक्ष

**बीड/प्रतिनिधी**
बीड तालुक्यातील चौसाळा ग्रामपंचायत ही सध्या चर्चेचा विषय ठरत असुन येथिल नागरिकांना मुलभुत सुविधा देण्यास ग्रामपंचायत स्पसेल फेल झालेली पाहीला मिळत आहे . शहरात तुंबलेल्या नाल्या , सफाई कामगारांची कमतरता तसेच शहरात विविध वार्डात बसविण्यात आलेले पथदिवे हे बंद अवस्थेत असुन वेळोवेळी याची कल्पना ग्रामपंचायतला देवुन सुध्दा कुठलीच कारवाई होताना दिसत नाही तसेच चौसाळा शहराला पाणी पुरवठा करणारया पाण्याच्या टाकीखाली गवताचे प्रमाण मोठया प्रमाणावर वाढले असुन मच्छराचे प्रमाण ही वाढल्याचे पाहायला मिळत आहे यामुळे परिसरात रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले असुन याकडे लक्ष देण्यास चौसाळा ग्रामपंचायतला वेळ नाही का ? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारताना दिसुन येत आहे शहरात लाखो रूपये खर्च करून बसविलेले पथदिवे बंद असल्यामुळे परिसरात अंधार दिसुन येत आहे येथिल नागरिकांना मुलभुत सुविधा देण्यास चौसाळा ग्रामपंचायत टाळाटाळ का ? करते असा प्रश्न देखील पडला आहे.



## भेंडखळ ग्रामपंचायतच्या वतीने वृक्षारोपण

**उरण/विठ्ठल ममताबादे**
निसर्गाचे, पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन व्हावे, पर्यावरण संरक्षण विषयक जनजागृती व्हावी या अनुषंगाने दिनांक १३/७/२०२४ रोजी भेंडखळ ग्रामपंचायतच्या वतीने ठाणकेश्वर मैदान येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास भेंडखळ ग्रामपंचायतच्या सरपंच मंजीता पाटील, उपसरपंच अक्षता ठाकूर, ग्रामपंचायत सदस्या प्राची ठाकूर,ग्रामपंचायत सदस्य दिपक ठाकूर, अजित ठाकूर ,लिलेश्वर भगत , अभिजीत ठाकूर,ग्रामपंचायत सदस्या



संगीता भगत, सोनाली ठाकूर,प्राची ठाकूर ,शितल ठाकूर ,स्वाती घरत ,स्वाती पाटील, ग्रामविकास अधिकारी किरण केणी, ग्रामपंचायत वरिष्ठ लिपिक दिपाली मते,ग्रामपंचायत कर्मचारी अंगणवाडी सेविका, भेंडखळ गावातील नागरिक आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विविध प्रकारचे झाडे लावून कार्यक्रम यशस्वी केला. या कार्यक्रमातून झाडे वाचवा, झाडे जगवा, पर्यावरणाचे संरक्षण करा,पर्यावरणचे संवर्धन करा असा संदेश देण्यात आला.

## महाराष्ट्र प्राईड अवार्डने दत्तात्रय मुजमुले सन्मानित जिजाऊ सुपर अबॅकस अकॅडमीने पटकावला मानाचा पुरस्कार

केज/प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंग मंदिर येथे दिनांक ७ जुलै रोजी राज्यस्तरीय सुपर अबॅकस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यास्पर्धे दरम्यान अबॅकस क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जिजाऊ सुपर अबॅकस अकॅडमीचे संचालक दत्तात्रय मुजमुले यांना अबॅकस क्षेत्रातील मानाच्या महाराष्ट्र प्राईड अवार्डने सन्मानित करण्यात येते.

महाराष्ट्रात सुपर अबॅकसचे जवळपास सर्वत्र सेंटर्स आहेत. त्यामध्ये




अबॅकस क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या निवडक सेंटर्सना अबॅकस क्षेत्रातील मानाच्या महाराष्ट्र प्राईड अवार्ड दिला जातो त्यामध्ये बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मौजे धनेगाव कॅम्प येथील जिजाऊ सुपर अबॅकस अकॅडमीचे संचालक दत्तात्रय मुजमुले यांना हा अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

हा अवॉर्ड प्रदान करण्यासाठी एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ पायल चौबे , शिवसेनेचे (शिंदे गट) जिल्हाप्रमुख तथा माजी उपमहापौर छत्रपती संभाजी नगर राजेंद्र जंजाळ,सुपर अबॅकसचे सर्वेसर्वा मनीष महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# बार्टी कडून राबविण्यात येणाऱ्या पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण अर्जाची मुदत वाढवा द्यावी - अक्षय गोटेगावकर

**पुणे/प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष, ऍड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सम्यक विद्यार्थी आंदोलन, सल्लागार समिती महाराष्ट्र राज्य डॉ.अरुण सावंत प्रा. अंजलीताई आंबेडकर, महेश भारतीय यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य पोलीस भरती पूर्व प्रशिक्षणाची तारीख मुदत वाढवण्यासाठी बार्टी प्रशासनाला निवेदन देण्यात आले. बार्टी प्रशासनाने तारीख न वाढवल्यास गाव खेड्यातील अनेक राज्यभरातील मुले या योजनेपासून वंचित राहतील.

महासंचालक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी संघ लोकसेवा आयोग (नागरी सेवा), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा, न्यायिक सेवा, अभियांत्रिकी सेवा), पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण, बँक, (IBPS) रेल्वे, एल.आय.सी इतर तत्सम स्पर्धा परीक्षांच्या पूर्व प्रशिक्षणासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत त्यासाठी, ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम दिनांक: ०३/०७/२०२४ ती वाढवून १५ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढवून मिळणे साठी निवेदन दिले होते व सर्व मान्यता प्राप्त विद्यापीठांच्या तृतीय आणि शेवट वर्षात शिकत असलेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना अर्जदार म्हणून पात्र करण्यात यावे स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र शासनामार्फत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ३० ऑक्टोबर २०२३ च्या शासन निर्णयानुसार सर्वकष धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने बार्टी, पुणे मार्फत सन २०२४-२५ करिता संघ लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या (नागरी सेवा) दिल्ली व महाराष्ट्र करिता, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या




राज्यसेवा (राजपत्रित), न्यायिक सेवा, अभियांत्रिकी सेवा, पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण तसेच बैंक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी या व इतर तत्सम स्पर्धा परीक्षांच्या पूर्व प्रशिक्षणाकरीता राज्यभरातून उमेदवार ऑनलाईन अर्ज सादर करत आहेत परंतु सर्व मान्यता प्राप्त विद्यापीठांच्या तृतीय आणि चतुर्थ वर्षात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना आपण पात्र ठरवत नसल्याची बाब समोर येत आहे ही बाब अतिशय चुकीची असून ती तात्काळ मागे घेण्यात यावी व सर्व मान्यताप्राप्त विद्यापीठ विद्यापीठांच्या सर्व शाखेचे विद्यार्थी यांचे तृतीय व चतुर्थ शेवट वर्षाचे प्रमाणपत्र अजून विद्यापीठाकडून मिळालेले नसल्याने त्याची अर्ज करण्याची तारीख ही वाढवून १५ ऑगस्ट २०२४ पर्यंत करण्यात यावी. व चालू उत्तीर्ण प्रमाणपत्रावर त्यांना पात्र ठरविण्यात यावे. सदर निवेदनावर गांभीर्याने विचार करून आपल्या बार्शी प्रशासनाकडून योग्य ती पावले उचलली न केल्यास राज्यभरात समाज कल्याण आयुक्त कार्यालयासमोर निदर्शनासह आंदोलन करण्यात येईल याची नोंद भारती प्रशासनाने घ्यावी दरम्यान झालेल्या कायदा व सुव्यवस्थेची सर्व जबाबदारी बार्टी प्रशासनावर राहील याची नोंद घ्यावी.




# महावितरण मधील कंत्राटी कामगारावर उपासमारीची वेळ ! (१६तारखे पासून ४२ कामगाराचे आमरण उपोषण करणार)

**केज/ प्रतिनिधी**

केज तालुक्यातील हातावर पोट असणारे अनेक महावितरण कंत्राट कामगारावर तीन महीण्या पासुन पगार नसल्याने उपास मारीची वेळ आली आहे त्यामुळे १६/०७/२०२४ पासुन ४३ कंत्राट कामगार बीड मंडळ कार्यालय येथे अमरण उपोषणाला बसणार आहेत याविषयी सविस्तर वृत्त असे की सर्व वीज कंत्राटी कामगार केज विभाग यांनी निवेदनाद्वारे म्हटले आहे की कि आम्हांला माहे,एप्रिल, में, जून, तीन महिन्याचे पगार (पेमेंट) अजून झाले नाही. ३महिने आमची पगार झाली नाही आमच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. ३ महिने पगार नसल्यामुळे आम्ही आमच्या घरात किरान भरु शकत नाही ३ महिने पगार नसल्याने घरातील व्यक्ती आजारी पडल्यावर आमच्याकडे उपचारासाठी पैसे नाहीत ३ महिने पगार नसल्याने मुलांच्या शिक्षनाचा खर्च करू शकत नाही ३ महिने पगार नसल्याने स्वतःच्या तबियत ची काळजी घेऊ शकत नाही ३ महिने पगार नसल्याने आई वडिलांना मेडिकल गोळ्या देऊ शकलो नाही एक आवर्जून विनंती, आम्हा कामगार यांच्या घरात कोणाचे आई वडील आजारी, तर कोणाचे बायकोचा दवाखाना तर कोणाच्या लेकराचं शिक्षण तर कोणाचं पोटच फक्त या कामावर अवलंबून आहे, म्हणून साहेबाना विनंती आहे लवकर आमची पगार (पेमेंट) करावी आपल्या माहितीस्तव असे निवेदन देऊन यावर काही दखल घेण्यात नाही आली तर आम्ही सर्व कामगार केज सब डिव्हिजन मध्ये पासुन दि. १३/०७/२०२४ पासून काम बंद आंदोलन करणार आहोत. व १६/०७/२०२४ पासून मंडळ कार्यालय बीड या ठिकाणी आमरण उपोषण केज सब डिव्हिजन मधील ४२ कामगार करणार आहोत जो पर्यंत तीन महिन्याचे पेमेंट मिळत नाही तोपर्यंत उपोषण चालू राहील यामध्ये काही अनुसूचित प्रकार घडला तर याची सर्वस्व जबाबदारी आपल्या कार्यालयाचे अधिकारी प्रशासनानाकडे असेल. आज आमच्या परिवारावर आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे असे निवेदनाद्वारे ४३ कंत्राट कामगारांनी म्हटले आहे तरी संमंधीत प्रशासनाने कंत्राट कामगारांच्या निवेदनाची दखल घ्यावी अशी मागणी कंत्राट कामगारांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# कै. मेजर प्रभाकर चव्हाण यांच्या पुण्यतिथी निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**सोलापूर/विश्वास चोपडे**

कै.मेजर प्रभाकर भगवान चव्हाण माजी सैनिक यांच्या पुण्यतिथीनिमित्त जि.प.प्रा. शाळा बिटरगाव येथे दिनांक १२/०७/२०२४ रोजी मुलांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.त्यांनी २४ वर्ष देशाची सेवा केली.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक किशोरीलाल चोपडे, उपशिक्षक चांदणे (गुरुजी) सैनिक यांची पत्नी मैनाबाई प्रभाकर चव्हाण मुलगा युवराज चव्हाण (शिक्षक) मुलगा शंकर चव्हाण, शुभांगी चव्हाण माधुरी चव्हाण शिक्षिका, अजित गुंडगिरी आदी उपस्थित होते.

# देशात साखळी हल्ल्याचा कट; स्फोटके, प्रशिक्षणाची जबाबदारी छत्रपती संभाजीनगरच्या इंजिनियरवर

**छ.संभाजीनगर/प्रा संजय तुपे**

आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटना इसिसच्या संपर्कात असल्याच्या आरोपाखाली हर्सल परिसरातून राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) अटक केलेल्या मोहम्मद झोहेब खान (४०) याच्यामार्फत ५० पेक्षा अधिक तरुणांना व्हॉट्सॲप ग्रुपद्वारे स्फोटके तयार करण्याचे प्रशिक्षण देऊन देशात साखळी हल्ले घडविण्याचा कट होता, असा धक्कादायक आरोप एनआयएने केला आहे. शुक्रवारी एनआयएच्या मुंबई न्यायालयात दाखल दोषारोपपत्रात हे आरोप ठेवण्यात आले आहेत. मोहम्मद झोहेब खान याला एनआयएने १५ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगरमधील हर्सल परिसरातील घरातून अटक केली होती. लिबियास्थित त्याचा नातेवाईक मोहम्मद शोएब खान याने त्याला इसिसमध्ये भरती



केले होते. झोहेबला आंतरराष्ट्रीय हस्तकांकडून मार्गदर्शनही सुरू होते, असे एनआयएच्या तपासात निष्पन्न झाले. सात महिन्यांपासून 'एनआयए'ने त्याच्यावर पाळत ठेवली होती. त्याने इसिसची 'बैत' घेतली होती. वर्क फ्रॉम होमचे कारण दाखवून तो घरातूनच सूत्रे हलवत होता. एनआयएच्या पथकाने १५ फेब्रुवारी रोजी शहरात ९ ठिकाणी छापे मारत झोहेबला अटक केली. त्याच्याकडून लॅपटॉप, महत्त्वाची कागदपत्रे, इसिसच्या कट्टरवादाशी संबंधित पुस्तके जप्त केली होती.

दोषारोपपत्रात काय ठेवलाय ठपका?

- लिबियास्थित शोएबने झोहेबला इसिसमध्ये सहभागी केले होते. दोघे मिळून भारतविरोधी कटकारस्थान रचत होते. देशातील प्रमुख संवेदनशील स्थळांवर दहशतवादी हल्ले करण्यासाठी तरुणांची भरतीदेखील करत होते.
- या सर्व हल्ल्याचे ते मुख्य सूत्रधार होते.
- हल्ल्यानंतर झोहेब अफगाणिस्तान किंवा तुर्कस्तानमार्गे सिरियाला जाणार होता.

वेब डेव्हलोपर ते इसिसच्या वेबसाईटची जबाबदारी

अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेला झोहेब बंगळुरूमध्ये नामांकित कंपनीत वेब डेव्हलोपर होता. गलेगठ्ठ पगाराची नोकरी सोडून तो दहशतवादाकडे वळला. त्यानंतर तो इसिसचे संकेतस्थळ विकसित करण्यासाठीदेखील मदत करीत असल्याचे एनआयएने दोषारोपपत्रात म्हटले आहे. याद्वारे तो देशभरातील तरुणांना हिंसक विचारांकडे वळविण्यासाठी प्रोत्साहन देत होता. ५० पेक्षा अधिक तरुण संपर्कात देशात इसिसच्या कारवायांसाठी तरुणांची भरती करण्याची जबाबदारी झोहेबवर होती. त्यासाठी त्याने व्हॉट्सॲप ग्रुप तयार करून शहर व आसपासच्या परिसरातील ५० पेक्षा अधिक तरुणांना या ग्रुपमध्ये समाविष्ट केले होते. त्यात तो सातत्याने स्फोटकांच्या निर्मिती आणि आयईडी बनविण्याचे व्हिडीओ शेअर करीत होता. त्यानंतर कारवाईचा आराखडाही तयार केला होता. ज्यामध्ये देशातील विविध ठिकाणांवर दहशतवादी हल्ल्यांचे नियोजन, तयारी आणि अंमलबजावणी व हल्ल्यांच्या अंमलबजावणीनंतर काय पाऊल उचलायचे, याचेदेखील पुरावे एनआयएच्या हाती लागले आहेत.ॉ

# देशात मुबलक कांदा असताना अफगाणिस्ताना तून आयात ! शेतकरी संघटना आक्रमक

**नाशिक/सुरेश इंगळे.**

भारताने कोणत्याही देशातून कांदा आयात न करता केंद्र सरकारने कांद्याच्या आयातीवर संपूर्ण बंदी घालावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी केली आहे. अन्यथा शेतकऱ्याकडून राज्यात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, याबाबतचे पत्र नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्याकडे देण्यात आले. देशात मुबलक कांदा असतानाही अफगाणिस्तानातून कांद्याची आयात केल्यामुळे शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. गेल्या आठवड्यात दिल्लीतील काही



व्यापाऱ्यांनी अफगाणिस्तानातून कांदा आयात केला. महाराष्ट्रसह अनेक राज्यातील शेतकऱ्यांकडे रब्बी कांद्याचा मुबलक प्रमाणात साठा असून केंद्र सरकार हे बफर स्टॉकच्या माध्यमातून पाच लाख टन कांदा साठवून ठेवलेला आहे. शेतकऱ्यांच्या कांद्याला बाजार समितीत आता कुठेतरी उत्पादक खर्चाच्या आसपास दर मिळत आहे .मागील काही वर्षांमध्ये कांद्याच्या दरात सततच्या घसरणीमुळ कांदा उत्पादकाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच केंद्र सरकारच्या कांद्यावरील निर्यात शुल्क ,किमान निर्यात मूल्य व नंतर थेट कांदा निर्यात बंदी या निर्णयामुळे कांदा दरात कमालीची घसरण होऊन शेतकऱ्याचे कोट्यावधीचे नुकसान झालेले असताना अशातच गेल्या काही दिवसापासून दरात होणारी थोडीफार वाढ शेतकऱ्यांना थोडासा नफा मिळून देऊ शकते. असे असताना देशात कांदा आयात करून देशांतर्गत कांद्याचे भाव पाडण्याचे षड्यंत्र रचले जात आहे .कांद्याला पुढील काळातही चांगले दर मिळणे अपेक्षित आहे, त्यासाठी सरकारने तत्काळ अफगाणिस्तान व इतर कोणत्याही देशातून भारतात कांदा आयात करू नये .यासाठी १००% कांदा आयातीवर बंदी आणावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेकडून करण्यात येत आहे. केंद्र सरकारने मागील वर्षी ऑगस्टमध्ये कांद्यावर निर्यात ४०% शुल्क लागू केले. त्यानंतर ८०० डॉलर किमान निर्यात मूल्य लागू केले. डिसेंबर महिन्यात थेट संपूर्ण कांदा निर्यातीवर बंदी आणली. सलग दहा महिने कांदा निर्यातीवर वेगवेगळी निर्बंध असताना लोकसभेच्या मतदानापूर्वी मे महिन्यात कांद्याची निर्यात बंदी सरकारने हटवली होती. परंतु कांदा निर्यातीवर ४०% निर्यात शुल्क व साडेपाचशे डॉलर किमान निर्यात मूल्य या अटी लागू केल्याने शेतकऱ्यांच्या कांद्याची दरवार रोखल्या गेली .सरकारने ४०% निर्यात शुल्क ,५५० डॉलर किमान निर्यात मूल्य हेही तत्काळ हटवावे अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत केंद्र सरकारकडे करण्यात आली आहे. सरकारने तत्काळ कांदा आयात बंदीचे व निर्यातीवरील शुल्क पूर्णपणे हटवण्याचे वरील दोन्ही निर्णय घ्यावे अन्यथा महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेकडून संपूर्ण राज्यात तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल असा इशारा यावेळी देण्यात आला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077